# ANNEXURE – B

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १६ (३) अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या उप समितीच्या शिफारसी:-**

- शैक्षणिक संस्थेच्या सर्व अभ्यासक्रमांमधील प्रथम वर्षाची एकूण प्रवेश क्षमता (Institutional Quota/NRI Quota यातील प्रवेश संख्या वगळुन), तसेच TFWS अंतर्गत प्रवेश संख्या व Direct IInd Year Admissions व अन्य तत्सम प्रवेश संख्या (अभ्यासक्रमनिहाय) विचारात घेऊन अशा एकूण प्रवेश संख्येच्या प्रत्येक विदयार्थ्याकरिता किमान रु.१००/-.
- शैक्षणिक संस्थेची एकूण प्रवेश क्षमता २०० हुन कमी असली तरी अशा प्रत्येक शैक्षणिक संस्थेकरिता किमान रु.२०,०००/-.
- Institutional Quota/NRI Quota मधील एकूण प्रवेश क्षमतेनिहाय प्रत्येक प्रवेशाकरिता किमान रु.१०००/-.
- सदर प्रक्रिया शुल्क हे सद्यस्थितीत संबंधित सर्व विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करिता लागु राहील.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे प्रक्रिया शुल्क सर्व संबंधित विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्थांनी दि. ३१ डिसेंबर २०१६ पूर्वी अदा करणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रक्रिया शुल्क सर्व संबंधित विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक संस्थांनी दि. ३१ जानेवारी २०१७ पूर्वी अदा करणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ चे प्रक्रिया शुल्क उक्त नमूद विहित कालावधीत अदा न केल्यास शैक्षणिक संस्थांना विलंब आकार भरावा लागेल.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६: करिता विलंब आकार :-

  १) ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१७ : प्रक्रिया शुल्काच्या २० %
  २) ०१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०१७: प्रक्रिया शुल्काच्या ४० %
  ३) ०१ मार्च ते ३१ मार्च २०१७: प्रक्रिया शुल्काच्या ६० %

  या प्रमाणे दर महिन्याला २० % अधिक विलंब आकार लागू होईल.
- शैक्षणिक वर्ष २०१६-१७: करिता विलंब आकार :-

  १)०१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०१७: प्रक्रिया शुल्काच्या २० %
  २)०१ मार्च ते ३१ मार्च २०१७: प्रक्रिया शुल्काच्या ४० %
  ३)०१ एप्रिल ते ३० एप्रिल २०१७: प्रक्रिया शुल्काच्या ६० %

  या प्रमाणे दर महिन्याला २० % अधिक विलंब आकार लागू होईल.

*****